लोकमत पुणे, शनिवार, दि. ४ जून २०१६

# संशोधनासाठी विद्यार्थ्यांना परदेश दौऱ्याचे 'गिफ्ट'

## स्मृती इराणी यांची घोषणा : डिजिटल क्लासरुम आणि ई-कन्टेंट लर्निंग मोड्युल्सचे उद्घाटन

पुणे : देशातील विद्यार्थ्यांना स्वत:च्या कल्पनेतून विविध विषयांतील नावीन्यपूर्ण संशोधन करण्यासाठी केंद्र शासनातर्फे व्यासपीठ उपलब्ध करुन दिले जात आहे. या स्पर्धेचे नाव व घोषवाक्यासाठी स्पर्धा घेतली जाईल. विद्यार्थ्यांना येत्या १५ जुलैपर्यंत त्यासाठी प्रस्ताव सादर करता येतील. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये १० ते १४ दिवस 'स्टडी टूर'साठी पाठविले जाईल, अशी घोषणा केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री स्मृती इराणी यांनी शुक्रवारी केली. दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित एका कार्यक्रमात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे विद्यार्थ्यांशी मराठीतून संवाद साधून इराणी यांनी उपस्थितांची मने जिंकली.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत (रुसा) प्राप्त झालेल्या निधीतून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात उभारण्यात आलेल्या डिजिटल क्लासरुम आणि ई-कन्टेंट लर्निंग मोड्युल्सचे तसेच राज्याच्या रुसाच्या फेसबुक पेजचे उद्घाटन स्मृती इराणी यांच्या हस्ते दिल्ली येथून झाले.

या प्रसंगी रुसाच्या राज्य प्रकल्प संचालक मनीषा वर्मा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वासुदेव गाडे, नांदेड विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंडित विद्यासागर, औरंगाबाद विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बी. ए. चोपडे, सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एन. एन. मालदार, महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी शंतनू जोशी, श्वेता जोगळेकर, मयूरी मडावी, मृणालिनी टेकाम या विद्यार्थ्यांशी इराणी यांनी मराठीतून संवाद साधला.

नावीन्यपूर्ण संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केंद्रीय मन्युषबळ विकास मंत्रालयातर्फे कोणते उपक्रम राबविले जात आहेत, असा प्रश्न शंतनू जोशी या विद्यार्थ्याने विचारल्यानंतर स्मृती इराणी अस्सल मराठीमध्ये म्हणाल्या, ''जोशीसाहेब तुम्ही प्रकल्प तयार करा आणि दिल्लीत या...'' यावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. श्वेता जोगळेकर हिने विचारलेल्या मेक इन इंडिया, स्मार्ट सिटीसारख्या योजनांत विद्यार्थ्यांचे योगदान कशा स्वरुपाचे असेल, या प्रश्नाचे उत्तर देऊन 'सामूहिकरीत्या मला भेटण्यासाठी या', असे निमंत्रण दिले. तसेच नावीन्यपूर्ण संशोधनाला वाव देण्यासाठी राष्ट्रीय स्पर्धेची घोषणा केली. या स्पर्धेचे नाव, मानचिन्ह, घोषवाक्य तयार करण्याचे आवाहन केले. या स्पर्धेचे नाव, मानचिन्ह, घोषवाक्य तयार करण्याचे आवाहन केले. (प्रतिनिधी)





व्हिडीओ कॉन्फरन्सव्दारे पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांशी दिल्लीतून संवाद साधताना स्मृती इराणी. (दुसऱ्या छायाचित्रात) प्रश्न विचारणारी विद्यार्थीनी.

- विद्यापीठांनी व महाविद्यालयांनी केंद्र शासनाच्या स्किल इंडियांतर्गत विविध अभ्यासक्रम सुरु करावेत, असे नमूद करुन इराणी म्हणाल्या, की या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून स्किल इंडिया कार्यक्रम व मुद्रा योजना, स्टँडअप योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावर स्वत:सह इतरांनाही रोजगार निर्माण करता येईल. ग्यान योजनेअंतर्गत प्रदेशातील नामांकित प्राध्यापक, शिक्षणतज्ज्ञ देशात येऊन विद्यापीठात लेक्चर देतील. डॉक्टरेट करीत असलेल्या विद्यार्थी महिलांना प्रोत्साहन दिले जात आहे, असेही इराणी यांनी या वेळी सांगितले.

- मृणालिनी टेकाम या विद्यार्थिनीने विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कोणते उपक्रम राबविले जातात, असे विचारले. यावर केंद्र शासनाने राज्यातील विद्यापीठांना समुपदेशकांची नियुक्ती करण्याच्या सूचना दिल्या असल्याचे इराणी यांनी स्पष्ट केले. तसेच, स्थानिक भाषेत शिक्षण झालेल्या विद्यार्थ्यांना गणित, विज्ञान व अभियांत्रिकी या अभ्यासक्रमांचे शिक्षण घेताना अडचणी येतात. त्यामुळे १३ भाषांत तज्ज्ञांची व्याखाने ऑनलाईन पद्धतीने मोफत उपलब्ध केली जाणार आहेत. त्याचप्रमाणे जुन्या प्रश्नपत्रिकांचे संचही उपलब्ध करुन दिले जातील, असे नमूद केले.

# विद्यापीठांत आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम

## परदेशी विद्यापीठांशी करार : भारतीय भाषांसाठी प्रयोगशाळा

सुरेश भटेवरा • नवी दिल्ली

तमाम सरकारी महाविद्यालये व विद्यापीठांचा अभ्यासक्रम लवकरच आंतरराष्ट्रीय दर्जाचा बनणार आहे. भारत सरकारने त्यासाठी वॉशिंग्टन विद्यापीठ, गेल विद्यापीठ यांसारख्या जगातल्या नामवंत तंत्रशिक्षण संस्थांशी करार केले आहेत.

एडिनबर्ग, पेनिसिल्व्हानिया, एमआयटी केंब्रिज, बर्कले व जॉर्जिया विद्यापीठांनी विद्यापीठांचा अभ्यासक्रम आंतरराष्ट्रीय दर्जाचा करुन देण्याची तयारीही दर्शवली आहे. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत विविध (पान ९ वर)

### परदेशी तज्ज्ञांचे मार्गदर्शन

देशातल्या तमाम विद्यापीठांना आंतरराष्ट्रीय मानदंडानुसार आपले अभ्यासक्रम तयार करण्यासाठी या उपक्रमाद्वारे आता परदेशी विद्यापीठे तसेच विविध क्षेत्रांतल्या परदेशी तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. मुख्यत्वे विज्ञान, गणित, अभियांत्रिकी व समाजशास्त्र विषयांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासक्रम परदेशातील विद्यापीठे तयार करुन देणार आहेत.

देशातल्या बहुतांश विद्यार्थ्यांची आजवर अशी तक्रार होती, की सरकारी महाविद्यालये व विद्यापीठांमधील अभ्यासक्रम बराच जुना झाला असून, आंतरराष्ट्रीय नोकऱ्यांच्या स्पर्धेत या जुनाट अभ्यासक्रमामुळेच आम्ही मागे पडतो. केंद्राने या तक्रारीचा गांभीर्याने विचार करुन राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान हा महत्त्वाकांक्षी उपक्रम मे २०१४ मधे सुरु केला. - स्मृती इराणी

## विद्यापीठांत आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम

(पान १ वरुन) प्रकल्पांच्या डिजिटल लॉंचिंग प्रसंगी दिल्लीत उपरोक्त घोषणा मनुष्यबळ विकास मंत्री स्मृती इराणींनी केली.

देशातील ३५ राज्ये या नव्या शैक्षणिक क्रांतीत सहभागी झाली असून, केंद्र सरकारने या उपक्रमासाठी ८ हजार कोटी रुपये दिले आहेत. देशातील तीन लाखांहून अधिक विद्यार्थी सध्या या उपक्रमाशी संलग्न असून देशातल्या सर्व विद्यापीठांतून आंतरराष्ट्रीय दर्जाचा गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम या प्रकल्पाद्वारे शिकवला जावा, हा सरकारचा उद्देश आहे.

देशातल्या तमाम विद्यापीठांमधे एका स्पर्धेव्दारा लवकरच १० स्टार्टअपची स्थापना केली जाईल. याखेरीज ३५ नव्या विद्यापीठांमधे (प्रत्येक राज्यातील एक) विद्यापीठास स्कील इंडिया योजनेच्या विशेष सुविधा प्रदान केल्या जाणार आहेत. भारतीय भाषांमधे विलोभनीय विविधता आहे. उच्चशिक्षणात त्याचा समावेश व्हावा आणि या भाषांच्या वैभवात नव्याने भर पडावी, यासाठी प्रत्येक राज्यात भाषांची एक मॉडेल प्रयोगशाळा स्थापन करण्यात येणार आहे असे इराणी म्हणाल्या.

महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ शनिवार, ४ जून २०१६

# मंत्र्यांचे विद्यार्थ्यांना दिल्लीचे निमंत्रण

म. टा. प्रतिनिधी, पुणे

**प्रश्न : आमच्याकडे अनेक कल्पना आहेत. त्यासाठी तुम्ही 'टेड टॉक'सारखं काही सुरू करणार आहात का ?**

उत्तर : तुमची कल्पना खूपच चांगली आहे. तुम्ही तुमचा प्रकल्प बनवा आणि दिल्लीला या. तुम्हाला पुढच्या आठवड्यात शक्य आहे? या दिल्लीला...

**प्रश्न : आम्ही आमचे प्रकल्प सरकारी यंत्रणांच्या मदतीसाठी कसे पाठवू शकतो?**

उत्तर : तुम्ही प्रकल्प आराखडा तयार करा. मला भेटायला या. तुमच्या कल्पना देशाच्या विकासासाठी वापरण्याचा आपण नक्कीच प्रयत्न करू.

विद्यापीठातील एखादा विद्यार्थी असा काहीसा प्रश्न विचारतो आणि देशभरातील सर्व विद्यापीठांवर नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणेचा मंत्री सरळ या विद्यार्थ्याला दिल्लीत सादरीकरणासाठी बोलावतो, असे आपण फार तर एखाद्या सिनेमात पाहिले असेल. पण, शुक्रवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित एका कार्यक्रमात उपस्थितांना असाच अनुभव घेतला.

**कल्पना सादर करण्यासाठी इराणींचे आवाहन**

विद्यापीठाच्या डिजिटल क्लासरूमचे केंद्रीय मनुष्यबळविकासमंत्री स्मृती इराणी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे शुक्रवारी उद्‍घाटन केले. उद्‍घाटनानंतर इराणी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्या वेळी विद्यापीठात शिकणाऱ्या शंतनू जोशी, श्वेता जोगळेकर या विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना इराणी यांनी त्यांना थेट दिल्ली भेटीचेच आमंत्रण दिले.

व्हिडिओ कॉन्फरन्सिंगदरम्यान इराणी यांनी देशभरातील दहा निवडक ठिकाणच्या शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. गडचिरोलीच्या मयुरी मडाले हिने या वेळी दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र सरकार नेमकी काय मदत करणार आहे, असा प्रश्न इराणी यांना केला. तर, मृणालिनी टेकाम हिने विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सरकार काय करत आहे, याची विचारणा केली. दुर्गम भागातील विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी लवकरच सुरू होणाऱ्या 'स्वयम्' या यंत्रणेची इराणी यांनी माहिती दिली. 'स्वयम्'च्या आधारे दुर्गम भागातील नागरिक आपल्या मोबाइलवरून इयत्ता नववी ते बारावीचे अभ्यासक्रम, काही डिप्लोमा अभ्यासक्रम असे एकूण पाचशे अभ्यासक्रम शिकू शकतील. येत्या काही महिन्यांत ही यंत्रणा कार्यान्वित होणार असल्याचे इराणी यांनी सांगितले. तसेच, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सरकार समुपदेशनाच्या सुविधा उपलब्ध करून देत आहे. पालकांनीही आपल्या पाल्यांवर अपेक्षांचे दडपण न टाकता, त्यांना त्यांच्या कलाने शिकू देण्याचे आवाहन इराणी यांनी केले.

## राज्यातील विद्यार्थ्यांची इराणींवर छाप...

या वेळी इतर राज्यांमधील विद्यार्थ्यांनी इराणी यांना आपले प्रश्न विचारले. संशोधक विद्यार्थ्यांच्या थकलेल्या फेलोशिप्सपासून ते दुर्गम भागातील विद्यार्थिनींच्या समस्यांपर्यंतचे अनेक प्रश्न यामध्ये समाविष्ट होते. मात्र, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी प्रभावित होऊन इराणी यांनी देशभरातील विद्यार्थ्यांसाठीच्या शैक्षणिक आदान-प्रदान योजनेला नाव आणि बोधचिन्ह सुचविणाऱ्या स्पर्धेची घोषणा केली. नाव आणि बोधचिन्ह सुचविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस म्हणून परदेश दौरा करण्याची संधी मिळवून देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.